# हिरव्या चाऱ्याच लोणचं : मुरघास



हरिदास बोंगे
आचार्य पदवी विद्यार्थी,
पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग,
पदव्युत्तर महाविद्यालय, म.फु.कृ.वि., राहूरी

जनावरांचे पालन पोषण करताना प्रत्येक हंगामात चाऱ्याची उपलब्धता हा महत्वाचा भाग आहे. महाराष्ट्रात साधारणतः तीन चार वर्षातून एक वर्ष दुष्काळ किंवा आवर्षण असते. अशा वेळेस जनावरांना संतुलित आहार न मिळाल्यास निश्चितच दुध उत्पादनात घट होते आणि दुध व्यवसाय धोक्यात येतो.

सर्वसाधारण आपल्याकडे फक्त पावसाळ्यातील तीन ते चार महिने हिरवा चारा भरपूर प्रमाणात उपलब्ध असतो. परंतू वर्षातील आठ ते नऊ महिन्यात हिरव्या चाऱ्याची कमतरता भासते. या अडचणीवर मात करण्यासाठी ऑगस्ट ते नोव्हेंबर पर्यंत मुबलक प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या चाऱ्याचा मुरघास बनवून त्याचा वापर मार्च ते जून या महिन्यात करू शकतो.

## मुरघास म्हणजे काय ?

हवा-विरहित जागेत आंबवून साठविलेला चारा म्हणजे मुरघास, हिरव्या चाऱ्याला आंबवून त्यातील पोषकद्रव्ये टिकवून ठेवली जातात.

## मुरघाससाठी उपयुक्त चारा पिके –

मुरघास बनविण्यासाठी जाड व भरिव खोड असणारी, साखरेचे प्रमाण जास्त असणारी एकदल पिके वापरावी. यामध्ये प्रामुख्याने मका, ज्वारी, बाजरी, ओट, संकरीत नेपियर, हत्तीगवत, उसाचे वाढे, मारवेल (पन्हाळी गवत) इ. पिकांचा समावेश होतो.

## मुरघाससाठी पिकांची कापणी -

- मका, बाजरी व ज्वारी – ५० टक्के फुलोऱ्यात ते चिकात असताना
- ओट - लोंबी बनताना ते चिकात असताना
- संकरित नेपियर (हत्तीगवत) – कापणीनंतर ३० ते ४० दिवस वाढलेले

## चांगला मुरघास कसा ओळखावा –

- चांगला मुरघास चमकदार, हिरवट पिवळ्या व सोनेरी रंगाचा असतो आणि त्याला आंबट गोड वास येतो.
- चांगल्या मुरघासाचा सामू ३.५ ते ४.२ एवढा असतो.
- जर मुरघासाचा रंग काळसर व बुरशीयुक्त असेल तर तो खराब झाला असे समजावे.



## मुरघास बनविण्याची प्रक्रिया –

- चारा कुट्टीच्या सहाय्याने बारिक (१-२ इंच) करून घ्यावा.
- मुरघास बनवायच्या खड्डयात प्रथम प्लॅस्टीकचा कागद सर्व बाजूंनी अंथरून घ्यावा व त्यावर कुट्टी केलेले चारा पिक टाकावे.
- प्रती क्विंटल कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी १ किलो युरिया, १ किलो मीठ, २ किलो उसाची मळी किंवा गुळ, १ किलो खनिज मिश्रण तयार करावे.
- तयार झालेले मिश्रण कुट्टीवर शिंपडावे व हवाबंद दाब द्यावा. (आत हवा राहणार नाही याची काळजी घ्यावी, जर आत हवा दबून राहीली तर त्यामध्ये बुरशीची वाढ होवून मुरघासची प्रत खालावते).
- ४० ते ५० दिवसात चाऱ्याची आंबवण्याची क्रिया पूर्ण होवून उत्तम दर्जाचे मुरघास तयार होते.

## मुरघासचे फायदे -

- हिरवा चारा त्याच्या गुणधर्मासह टिकवला जातो.
- पावसाळ्यात हिरवा चारा वाळवणे शक्ये नसते, अशा वेळेससुद्धा मुरघास तयार करता येतो.
- मुरघास खाण्यास रूचकर, कसदार, चवदार असल्यामुळे जनावरे आवडीने खातात व पचण्यास चांगले असते.
- पशुखाद्यावरील खर्च कमी होवून दुध उत्पादनात वाढ होते.
- खरिप व रब्बी हंगामातील जास्तीचा चारा साठवून गरजेनुसार चारातूटीच्या काळात वापरता येतो.
- सर्वसाधारण दिवसाला प्रत्येक गाईस २० किलो मुरघास द्यावा.
- अशाप्रकारे दुष्काळी परिस्थितीमध्ये तसेच उन्हाळ्यामध्ये हिरव्या चाऱ्याची पुर्तता करू शकतो.
- वाळलेल्या चाऱ्याच्या पौष्टिकतेच्या तुलनेत मुरघासची पौष्टिकता अधिक असते.
- मुरघासमुळे जनावरांची भूक वाढते व ते मुरघास जास्त खातात, वाया घालवत नाहीत. कारण ते रुचकर, स्वादिष्ट व सौम्य रेचक असते.
- मुरघासात तयार होणारे लॅक्टिक आम्ल हे गायी-म्हशीचे पचेंद्रियांत तयार होणाऱ्या रसासारखे असते म्हणून मुरघास पचवण्यास सोपा असतो.

(संपर्क: +९१ ९७६७२९२८०४)

★★★